# सुचनापत्र
# नाशिक ग्रामीण पोलीस भरती - २०१७
# सन २०१७ ची पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रियेबाबत.

---

पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामिण जिल्हा आस्थापनेवरील पोलीस भरती प्रक्रिया सन -२०१७ चे ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांची शारिरीक व मैदानी चाचणी दिनांक दिनांक २२/०३/२०१७ ते ०३/०४/२०१७ या कालावधीत घेण्यात आलेली आहे.

नाशिक ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस भरती - २०१७ ची लेखीपरीक्षा दिनांक १६/०४/२०१७ रोजी सकाळी ०७:३० ते ०९:०० या वेळेत पोलीस मुख्यालय, नाशिक ग्रामीण, आडगांव येथे घेण्यांत आलेली आहे. सदर परीक्षेसाठी एकुण १५१८ पात्र उमेदवारापैकी १०४९ उमेदवार हजर राहीले होते.

पात्र उमेदवारांच्या जाहिरातीमधील नमुद केलेल्या सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येनुसार निवडयादया हया तात्पुरत्या स्वरुपात तयार करण्यांत आलेल्या आहेत. सदरची निवड यादी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे व भरती निकषांची पुर्तता यांच्या आधीन राहुन तयार करण्यात येवुन पोलीस मुख्यालय, आडगांव येथील नोटीस बोर्डवर तसेच www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व नाशिक ग्रामीण घटकाचे संकेतस्थळांवर www.nashikruralpolice.gov.in येथे उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

जर कोणत्याही उमेदवाराला निवड यादया बाबत काही तक्रार असेल तर त्यांनी निवड यादया जाहिर झाल्याच्या वेळेपासुन ४८ तासाचे आत कार्यालय अधीक्षक ना.ग्रा/पोलीस उप अधीक्षक,(मुख्या.) नाशिक ग्रा. यांचेकडे समक्ष हजर राहुन लेखी तक्रार करावी. सदर तपासणी करीता कार्यालय अधीक्षक ना.ग्रा/ पोलीस उप अधीक्षक(मुख्या.), नाशिक ग्रामीण यांना प्राधिकृत करण्यांत आलेले असल्याने त्यांचा निर्णय अंतिम राहील. ४८ तासानंतर उमेदवारांची विंनती अमान्य करण्यांत येईल.

तरी सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येनुसार निवडयादी मध्ये ज्या उमेदवारांचा समावेष करण्यांत आलेला आहे. त्या उमेदवारांनी दिनांक ०२/०५/२०१६ रोजी सकाळी ०९:०० वाजता स्वत:चे शैक्षिणक मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे तसेच मुळ कागदपत्राचे छायाकिंत प्रतीचे दोन सेट सोबत घेवुन पोलीस मुख्यालय, आडगांव, नाशिक ग्रामीण येथे हजर राहावे.

या सर्व प्रक्रियेमध्ये वरील प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येनुसार अंतिम निवडयादी व प्रतीक्षा यादी तयार करण्यात येवुन प्रसिध्द करण्यात येईल .

**ठिकाण :- नाशिक ग्रामीण.**
**दिनांक :- २७/०४/२०१७**

Scanned by CamScanner